## डॉ. अरुण गांधी यांनी सांगितलेली एक आठवण



*डॉ. अरुण गांधी हे महात्मा गांधींचे नातू आणि 'एम. के. गांधी इन्सटिट्यूट ऑफ नॉन व्हायोलन्स' या संस्थेचे संस्थापक आहेत. महात्मा गांधींनी पालक म्हणून अहिंसेचं पालन करायला कसं शिकवलं त्याचं उदाहरण म्हणून ही गोष्ट सांगितली आहे.*

मी १६ वर्षांचा होतो आणि माझ्या आजोबांनी डर्बन या दक्षिण आफ्रिकेतल्या ठिकाणी १८ महिन्यांपूर्वी उसमळ्यांच्या जवळ स्थापन केलेल्या संस्थेत रहात होतो. हे ठिकाण वस्तीपासून दूर होतं त्यामुळे शेजारपाजारी कोणीच नव्हतं. त्यामुळे मी आणि माझ्या दोन बहिणी मित्रांना भेटायला किंवा सिनेमा पहायला शहरात जाण्यासाठी खूप आतुर असायचो. एक दिवस माझ्या वडिलांना एका दिवसभराच्या परिषदेसाठी शहरात जायचं होतं. त्यासाठी त्यांनी मला ड्रायव्हर म्हणून 'सोबत येणार का' असं विचारलं. मी लगेचच उडी मारुन तयार झालो.

मी शहरात निघालोच होतो त्यामुळे आईनं मला एक वाणसामानाची यादी दिली आणि माझ्याकडे दिवसभर वेळ असल्यानं वडिलांनी मला गाडीचं सर्व्हिसिंग वगैरे राहिलेली काही कामं करायला सांगितली. मी जेव्हा माझ्या वडिलांना सकाळी शहरात सोडलं तेव्हा ते म्हणाले, 'आपण इथेच संध्याकाळी ५ वाजता भेटू आणि सोबत घरी जाऊ'. माझी कामं मी पटापट संपवली आणि जवळच्या सिनेमा थिएटरमध्ये गेलो. जॉन वेनच्या सिनेमात मी इतका बुडून गेलो की मला वेळेचं काहीच भान राहिलं नाही. माझ्या लक्षात आलं तेव्हा ५.३० वाजले होते. मग गॅरेजमध्ये जाऊन, गाडी घेऊन माझे वडिल माझी जिथे वाट पहाणार होते तिथे पोचायला मला ६ वाजले.



त्यांनी मला विचारलं, 'तुला उशीर का झाला ?' जॉन वेनचा सिनेमा बघत होतो म्हणून उशीर झाला हे सांगायची मला इतकी लाज वाटत होती की मी त्यांना सांगितलं 'गाडी तयार नव्हती म्हणून मला उशीर झाला'. त्यांनी गॅरेजमध्ये आधीच फोन केला असेल हे माझ्या लक्षातच आलं नाही. माझ्या सांगण्यातला खोटेपणा त्यांच्या लक्षात आल्यावर ते म्हणाले, 'मी तुला वाढवण्यात काहीतरी चूक केली असणार कारण मला खरं सांगण्याइतका आत्मविश्वास तुझ्यात आलेला नाही. माझी काय चूक झाली असेल ते कळावं म्हणून मी आता घरापर्यंत १८ मैल चालत येतो आणि त्यावर विचार करतो'.

मग सुटाबुटातले माझे वडिल त्या निर्जन, अंधाऱ्या रस्त्यावरुन चालायला लागले. मी त्यांच्यामागे गाडी चालवत होतो. माझ्या एका मूर्ख खोटेपणामुळे माझ्या वडिलांना किती त्रास सहन करावा लागतोय ते पहात होतो. त्या क्षणी मी तिथेच निर्धार केला की मी परत कधीच खोटं बोलणार नाही.

या घटनेबद्दल मी जेव्हा जेव्हा विचार करतो तेव्हा मला एका गोष्टीचं राहूनराहून आश्चर्य वाटतं. आपण आपल्या मुलांना ज्या प्रकारे शिक्षा करतो तशी त्यांनी मला शिक्षा केली असती तर मी तो धडा शिकलो असतो का ? मला तसं वाटत नाही.

मी ती शिक्षा सहन केली असती आणि परत तसंच वागलो असतो. पण अहिंसेची ही एक कृती इतकी प्रभावी होती की ते कालच घडल्यासारखं वाटतं. ही अहिंसेची ताकद आहे.

**डॉ. अरूण गांधी**

**(मराठी अनुवाद – नीलांबरी जोशी)**